# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
(उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)
छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, 6 वा माळा,
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर- 400001
Email-gardendept.nmc@gmail.com


क्रमांक :- NMC/OWL/GRDN/2026-2027/ 585.6

दिनांक:- 14.05.2026

प्रति,

विभागीय अधिकारी (पश्चिम),
नागपूर सुधार प्रन्यास,
विभागीय कार्यालय (पश्चिम), उत्तर अंबाझारी मार्ग,
नागपूर.

**विषय:-** त्रिमूर्ती नगर येथील मौजा-भामटी,खसरा क्र.27 (part), 54(P), 53(P), 52(P) येथील नागपूर सुधार प्रन्यासच्या 2109.623 चौ.मी. जागेवर विभागीय कार्यालय (पश्चीम) तसेच अभिलेख कक्ष (Record Room) या प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडांबाबत.

**संदर्भ:-** कार्यालयास प्राप्त आपले दिनांक 04/07/2025 चे पत्र

**मा. आयुक्त तथा अध्यक्ष, वृक्ष प्रधिकरण समिती, म.न.पा. नागपूर यांनी दिनांक 27.03.2026 रोजीच्या सभेत दिलेल्या मंजुरी अन्वये,** आपणास खालील झाडे कापणी करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

त्रिमूर्ती नगर येथील मौजा-भामटी,खसरा क्र.27 (part), 54(P), 53(P), 52(P) येथील नागपूर सुधार प्रन्यासच्या 2109.623 चौ.मी. जागेवर विभागीय कार्यालय (पश्चीम) तसेच अभिलेख कक्ष (Record Room) या प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **करंजी-07, कडूनिंब-02 व पिंपळ-01 अशी एकूण 10 नग (नॉन हेरीटेज-08, हेरीटेज-02) वृक्षास जमिनीपासून कापणी करण्याची आपणास परवानगी देण्यात येत आहे.**

1. आपणास परवानगी पत्रात उल्लेखलेल्या झाडाव्यतिरिक्त इतर प्रजातीची झाडे / झाडांच्या फांद्या छाटणी/कापणी करण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

2. आपणास झाड/झाडे/झाडांच्या कापणी /फांद्या स्वखर्चाने व स्वत:च्या जबाबदारीवर कापणी/छाटणी कराव्या लागतील. झाड/झाडे/ कापणी करतांना रहदारीला अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

3. **तोडण्यात येणाऱ्या 10 नग झाडाऐवजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, जुलै 16, 2021/आषाढ 25 शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट—कलम (4) (ब) अन्वये तोडण्यात येणाऱ्या त्याच जातीची किंवा इतर कोणत्याही मूळ जातीची तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजित केलेल्या वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान सहा फुट इतक्या उंचीची 411 नग नविन झाडांची लागवड करावी. पोट-कलम (5अ) अन्वये लागवड करण्यात येणारी झाडे आपणास कमीत कमी सात वर्षाच्या कालावधी करिता जगवावी लागेल. या कालावधीत झाडे न जगल्यास तितक्याच संख्येतील झाडांची लागवड करून त्याची हानीपुर्ती (भरपाई) करण्यात यावी. तसेच लागवड करण्यात आलेल्या झाडाचा फोटोसह अहवाल दर सहा महिन्यात कार्यालयास सादर करावा.**

4. सदर परवानगी पत्रानुसार व नमूद केलेल्या अटीनुसार झाड/झाडे/झाडांच्या फांद्या छाटणी/कापणी कराव्या लागतील अन्यथा महाराष्ट्र (शहरी क्षेत्र) वृक्षजतन (सुधारित) अधिनियम 1975 अन्वये आपल्यावर कार्यवाही करण्यात येईल.

5. **वृक्ष तोडण्याची परवानगी दिल्यापासून 15 दिवसानंतरच वृक्ष तोडण्यात यावे.**

6. वृक्ष प्रत्यारोपण (Transplant) करण्याकरिता तांत्रिक सल्ला आवश्यक असल्यास उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, म.न.पा. नागपूर ला संपर्क साधावा.

7. परवानगी देऊनही झाडास कापणी किंवा झाडाच्या फांद्या न कापणी केल्यास झाड किंवा झाडाची फांदी पडून जीव व वित्तहानी झाल्यास सर्वस्वी जवाबदारी आपली राहील. कृपया याची नोंद घ्यावी.

8. **परवानगी पत्रात नमूद वृक्षाव्यतिरिक्त हेरीटेज वृक्ष असल्यास आपण हेरीटेज वृक्षाची कापणी करू नये. हेरीटेज वृक्षाची कापणी केल्यास महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, जुलै 16, 2021 / आषाढ 25 शके 1943 अन्वये प्रकरण 8 मुख्य अधिनियमाच्या कलम 21 मधील पोट—कलम (1) मध्ये एक हजार रुपयापेक्षा कमी नसेल आणि पाच हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या या मजकुराऐवजी शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येईल, अश्या पद्धतीचा वापर करून काढलेल्या झाडाच्या मुल्याइतके परंतु 1,00,000/- रुपयापेक्षा कमी नसेल इतक्या रकमेचा मजकूर दाखल करणायत येईल. कृपया याची नोंद घ्यावी.**

**टिप :-** अ) झाडे तोडण्याकरिता महानगरपालिकेचे अधिकृत ठेकेदार नसून कोणत्याही ठेकेदारास झाडे तोडण्याचा परवाना दिलेला नाही

वृक्ष संवर्धक
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी :-** वनपरिक्षेत्र सेमिनरी हिल्स, नागपूर यांना माहितीकरिता सादर.

Scanned with OKEN Scanner